# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभा दि ०८/०२/२०२४

## कार्यवृत्त

**आज दि ०८/०२/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, अग्निशमन व कर विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | **बांधकाम विभाग** |
| १ | **नगर परिषद मलकापूर पाणीपुरवठा विभागाचे आवारात कोंडवाडा रोड ते अग्निशमन शेड पर्यंत रस्ता काँक्रिटीकरण करणे बाबत.** |
| २ | **नगर परिषद मलकापूर पाणीपुरवठा विभागाचे आवारातील अग्निशमन वाहना करिता असलेले शेड दुरुस्ती करणे.** |
| ३ | **नगरपरिषद मलकापूर न.प. हद्दीत न.प. मालकीच्या व प्रस्तावित विकास आराखड्यात Mini Fire Station व कर्मचारी Quorters करिता आरक्षित जागेत अग्निशमन कर्मचारी करिता निवासस्थान बांधणे बाबत.** |
| | **अग्निशमन विभाग** |
| ४ | **नगर परिषद मलकापूर अग्निशमन सेवा विभाग बळकटीकरण करिता अग्निशामक वाहन खरेदी करणे** |
| | **कर विभाग** |
| ५ | **मलकापूर नगरपरिषद कर विभाग अंतर्गत चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणे बाबत.** |

**विषय क्र १:- नगर परिषद मलकापूर पाणीपुरवठा विभागाचे आवारात कोंडवाडा रोड ते अग्निशमन शेड पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे बाबत.**

नगर परिषद मलकापूर पाणीपुरवठा विभागाचे आवारात कोंडवाडा रोड ते अग्निशमन शेड पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी नगरपरिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मलकापूर न.प. पाणीपुरवठा विभागचे आवारात अग्निशमन विभागाचे वाहनांकरिता शेड असून सदर शेड पर्यंत अग्निशमन वाहन पोहचण्याकरिता प्रमुख रस्ता हा कोंडवाडा रोड कडील प्रवेशद्वारातून आहे. कोंडवाडा रोड कडील प्रवेशद्वार ते अग्निशमन शेड पर्यत कच्च्या स्वरूपाचा रस्ता असून पावसाळ्यात अग्निशमन वाहनांना ये-जा करण्यास मोठी अडचण होते. त्याच प्रमाणे अग्निशमन विभाग हे अत्यावश्यक सेवेत येत असून आणीबाणी प्रसंगी अग्निशामक वाहनांची हालचाल जलदगतीने करावी लागते. त्याकरिता सदर ठिकाणी रस्ता कॉंक्रिटीकरण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालाद्वारे नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता अग्निशमन विभाग हे अत्यावश्यक सेवेत येत असून वेळ प्रसंगी अग्निशामक वाहनांची हालचाल जलद गतीने होण्याकरिता पाणीपुरवठा विभागाचे आवारात कोंडवाडा रोड ते अग्निशमन शेड पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करण्याचे काम जिल्हा वार्षिक अग्निशमन बळकटीकरण योजना / नगरोत्थान / नागरी दालीतेत्तर आमदार, खासदार निधी, इतर शासकीय योजना अथवा उपलब्ध कोणत्याही शासकीय निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र २ :- नगर परिषद मलकापूर पाणीपुरवठा विभागाचे आवारातील अग्निशमन वाहना करिता असलेले शेड दुरुस्ती करणे.**

नगर परिषद मलकापूर पाणीपुरवठा विभागाचे आवारातील अग्निशमन वाहना करिता असलेले शेड दुरुस्ती करणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी नगरपरिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मलकापूर न.प. पाणीपुरवठा विभागचे आवारात अग्निशमन विभागाचे वाहनांकरिता शेड असून सदर शेड अग्निशामक वाहनांकरिता अत्यंत महत्वाचे असून बरेच वर्ष जुने आहे. त्यामुळे हे शेड बऱ्याच ठिकाणी क्षतिग्रस्त झालेले आहे. त्याच प्रमाणे अग्निशमन विभाग हे अत्यावश्यक सेवेत येत असून सदर शेडची दुरुस्ती, रंगरंगोटी व इतर आवश्यक कामे करणे अत्यंत गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालाद्वारे नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता अग्निशमन विभाग हे अत्यावश्यक सेवेत येत असून अग्निशमन वाहना करिता असलेले शेडला दुरुस्ती, रंगरंगोटी व इतर आवश्यक कामे करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ३ :- नगरपरिषद मलकापूर न.प. हद्दीत न.प. मालकीच्या व प्रस्तावित विकास आराखड्यात Mini Fire Station व कर्मचारी Quorters करिता आरक्षित जागेत अग्निशमन कर्मचारी करिता निवासस्थान बांधणे बाबत.**

नगरपरिषद मलकापूर न.प. हद्दीत न.प. मालकीच्या व प्रस्तावित विकास आराखड्यात Mini Fire Station व कर्मचारी Quorters करिता आरक्षित जागेत अग्निशमन कर्मचारी करिता निवासस्थान बांधणे बाबत

मुख्याधिकारी नगरपरिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मलकापूर नगर परिषद हि 'ब' वर्ग नगरपरिषद असून न.प. मलकापूर ची एकूण कर्मचारी पद संख्या यामध्ये अधिकारी व संवर्ग अग्निशमन कर्मचारी यांचीची पद संख्या मोठ्या प्रमाणात आहे. सद्यः स्थितीत मलकापूर न.प. च्या मालकीचे कोणतेही शासकीय निवास्थान अथवा तत्सम व्यवस्था नाही. तसेच अग्निशमन विभागा करिता आवश्यक असणारे Mini Fire Station ची व्यवस्थ देखील नाही. त्यामुळे न. प. अधिकारी व संवर्ग अग्निशमन कर्मचारी यांच्या करिता शासकीय निवस्थानाची व्यवस्था करणे व अग्निशमन विभागा करिता आवश्यक असणारे Mini Fire Station ची व्यवस्थ करणे गरजेचे आहे. तरी अधिकारी व संवर्ग अग्निशमन कर्मचारी यांच्या करिता शासकीय निवास्थानचे व अग्निशमन विभागा करिता Mini Fire Station चे बांधकाम करावे लागणार आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता न. प. अधिकारी व संवर्ग अग्निशमन कर्मचारी यांच्या करिता शासकीय निवस्थानाची व्यवस्था करणे व अग्निशमन विभागा करिता Mini Fire Station बांधणे गरजेचे असून निवास्थानचे व Mini Fire Station चे बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च जिल्हा वार्षिक निधी / नगरोत्थान / नागरी दालीतेत्तर योजना, आमदार, खासदार निधी, अथवा उपलब्ध कोणत्याही शासकीय निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ४:- नगर परिषद मलकापूर अग्निशमन सेवा विभाग बळकटीकरण करिता अग्निशामक वाहन खरेदी करणे.**

नगर परिषद मलकापूर अग्निशमन सेवा विभाग बळकटीकरण करिता अग्निशामक वाहन खरेदी करणे बाबत प्र. अग्निशमन अधिकारी यांच्या विषयावरील मुख्याधिकारी नगरपरिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मलकापूर नगरपरिषद ही 'ब' वर्ग नगरपरिषद असून मलकापूर शहराची लोकसंख्या ही जवळपास ६७,३०० इतकी असून सन २०११ पासून जनगणना झालेली नाही. सध्या स्थितीत मलकापूर शहराची लोकसंख्या ही १ लक्ष पेक्षा अधिक झालेली आहे व शहराचा विकास देखील झपाट्याने होत आहे. मलकापूर शहराची लोकसंख्या व शहराचा होणारा विकास लक्षात घेता सध्या स्थितीत न.प. मलकापूर अधिनस्त असलेली अग्निशमन व्यवस्था ही पुरेशी नसून भविष्यकाळात अग्निशमन व्यवस्थेचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे. त्याकरिता मलकापूर नगरपरिषद अग्निशमन विभागाकरिता अग्निशामक वाहन खरेदी करणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्र. अग्निशमन अधिकारी यांनी अहवालाद्वारे नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मलकापूर नगरपरिषद अधिनस्त अग्निशमन विभाग व्यवस्था शहराची लोकसंख्या व विकास लक्षात घेता पुरेशी नसल्याकारणाने अग्निशामक वाहन खरेदी करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च जिल्हा वार्षिक अग्निशमन बळकटीकरण योजना / नगरोत्थान / नागरी दालीतेत्तर आमदार, खासदार निधी, इतर शासकीय योजना अथवा उपलब्ध कोणत्याही शासकीय निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ५:- मलकापूर नगरपरिषद कर विभाग अंतर्गत चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणे बाबत.**

मलकापूर नगरपरिषद कर विभाग अंतर्गत चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणे बाबत कर निरीक्षक, कर अधीक्षक तथा उपमुख्यअधिकारी यांच्या विषयावरील मुख्याधिकारी नगरपरिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, नगरपरिषद मलकापूरची फेर चतुर्थ वार्षिक कर आकारणी सन २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीमध्ये झालेली आहे. यापुढील फेर चतुर्थ वार्षिक कर आकारणी पूर्ण करण्याकरिता नगर परिषद हद्दीमध्ये शासनाने नेमलेल्या S2 InfoTech यांनी केलेल्या ६०.८% इतक्या सर्वेक्षणाची माहिती मिळण्याकरिता मा. आयुक्त तथा संचालक न.प.प्र.स. मुंबई, यांना विनंती करण्यात आलेली होती परंतु सदर माहिती अप्राप्त आहे.

तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम १२४ (२) नुसार दर चार वर्षांनी फेर कर आकारणी करणे क्रमप्राप्त आहे. तसेच मा. आयुक्त तथा संचालक न.प.प्र.स. नवी मुंबई यांचे परिपत्रक क्र. नपप्रसं/ का-०८/ई-गव्हर्नस/ कर आकारणी/ २०२२/४८३६ दि. ०१ नोव्हेंबर २०२२ च्या सुधारित मार्गदर्शक सुचनेनुसार महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार चतुर्थ वार्षिक कर आकारणी व पुनर्निर्धारण संबंधित कार्यवाही ही नगरपरिषद नगरपंचायती यांनी प्रचलित कायदे नियमातील तरतुदी व स्थानिक परिस्थितीनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करावी. तसेच मा. आयुक्त तथा संचालक न.प.प्र.स. नवी मुंबई यांचे क्र. नपप्रसं/कार्या -१३/ २०२३-२४/ वसुली मोहीम /४८५६ दि. ०१ सप्टेंबर २०२३ च्या आदेशानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न वाढविण्याच्या अनुषंगाने मालमत्ता कर व पाणी पट्टी वसुली अभियान व मालमत्ता कर आकारणी प्रक्रिया पूर्ण करणेबाबत आदेशित केले आहे.

त्याचप्रमाणे मा. अध्यक्ष, ग्राहक पंचायत, मलकापूर व शहरातील इतर पक्षांनी व प्रतिष्ठित नागरिकांनी सन २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधी मध्ये झालेल्या फेर चतुर्थ वार्षिक कर आकारणीचे काम कोलब्रो कंपनीला देण्यात आले होते. सदर कंपनीची कामात अनियमितता असून करामध्ये अवास्तव वाढ केली आहे. असा गैरसमज नागरिकांमध्ये निर्माण झाल्यामुळे त्यांनी कराचा भरणा वेळेवर केलेला नाही. त्यामुळे त्यांनी फेर चतुर्थ वार्षिक कर आकारणी करण्याकरिता खालीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत.

१) नवीन कर आकारणी हि GIS / सॅटेलाइट पद्धतीचा वापर करून मालमत्तेची मोजणी करावी.

२) नवीन कर आकारणी हि चौरस फुट एवजी चौरस मीटर या एकका मध्ये करावी.

तसेच सध्या स्थितीत नगर परिषद हद्दीमध्ये एकूण १९८८० पेक्षा अधिक मालमत्ता आहेत. मात्र वाढते नागरिकीकरण, नवीन बांधकाम, जुन्या बांधकामात सुधारणा करून झालेल्या सुधारित व वाढीव बांधकाम यांची फेर चतुर्थ वार्षिक कर आकारणी न झाल्यामुळे मालमत्ता कर न लागलेल्या मिळकती उघडकीस येऊन त्यांच्यावर कर आकारणी करून नगर परिषदेचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढविणे शक्य होईल.

त्याकरिता संपूर्ण मिळकतीचे प्रत्यक्ष स्थळ मोजणी, सर्वेक्षण व कर मुल्यांकनाकरिता आवश्यक माहितीचे संकलन करून अद्यावत स्थळदर्शक नकाशा तयार करणे, कामात पारदर्शकता, अचूकता आणण्याकरिता प्रत्येक मिळकतीचे अद्यावत डिजिटल फोटोग्राफ तयार करणे, संपूर्ण कामाचे व सर्वेक्षणाची जी.आय.एस. प्रणालीचा वापर करुन माहिती त्वरित उपलब्ध होणेकरिता संगणकीकरण करणे व मिळकतीचे फोटो, माहिती व संगणकीकृत मोजमाप नकाशे डाटाबेसला जोडणी करून मिळकत धारकास उपलब्ध करून दिल्यास क्षेत्रफळ, बांधकामाचा प्रकार, उपयोग वापर इत्यादी बाबींमध्ये सुसूत्रता व पारदर्शकता येवून वाढीव मिळकत कराबाबत मिळकत धारकांना संपूर्ण माहिती नगर परिषदेच्या वतीने देणे शक्य होईल.

तसेच चतुर्थ वार्षिक कर आकारणी करतेवेळी शासनाच्या धोरणानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा, इंटरनेटचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने, सर्व मिळकतींचा सर्वेक्षण केलेला डाटा डिजीटलायझेशन करण्यात येवून त्यामध्ये सर्व सोयी-सुविधा उदा. पेमेंट गेटवे, ऑनलाईन पेमेंट, क्युआर कोड, यासारख्या सोयी उपलब्ध करुन,

डीजीटल सर्व डाटा रेकॉर्ड किपींग करुन अद्यावत करणे., शहरात खरेदीविक्री होणारे खरेदी-विक्रीखत यांचे मालमत्ताची नांवे हस्तांतरीत होणेसाठी मा. उपनिबंधक मुद्रांक शुल्क कार्यालय यांचे ऑनलाईन खरेदी-विक्री खतांची नोंदीसोबत आय.जी. आर. सोबत जोडणे (लिकींग करणे) याबाबतची सोय उपलब्ध करणे, तसेच या कामाचा वार्षिक देखभाल- दुरुस्ती (ॲन्युअल मेंटेनन्स) करणे, तसेच मालमत्ता धारकांना वेळोवेळी एस.एम.एस. किंवा व्हॉटसॲप वर मेसेज, सूचना देणे, ऑनलाईन कराचा भरणा करणे,बिल तयार करणे, असेसमेंट उतारा देणे या सर्व बाबी अंतर्भूत असलेली विकसीत संगणक आज्ञावली (सॉफटवेअर) विकसीत करणे. या सर्व बाबींचा अंतर्भाव केल्यास मिळकतधारकांना होणारा नाहक त्रास कमी होण्यास मदत होईल. पर्यायाने नगरपरिषदेकडील कर संग्राहक यांचाही वेळ व श्रमाची बचत होईल.

आजरोजी नगर परिषदेच्या अस्थापनेवरती असलेली अपुरी कर्मचारी संख्या तसेच नप कर विभागामध्ये एकूण ५ कर संग्राहक असून त्यापैकी ४ लिपिक व १ शिपाई कार्यरत आहे. तसेच नगरपरिषदेचा सुधारीत करण्यात आलेला आकृतीबंध यामुळे दिवसेंदिवस कर्मचारी संख्या कमी होत आहे. तथापि, उपरोक्त काम हे तांत्रिक दृष्टा कुशल व अनुभवी कर्मचारी यांच्या मार्फत पूर्ण केल्यास कर आकारणी बाबत नागरिकांच्या तक्रारी कमी होण्यास मदत होणार असल्याचे कर निरीक्षक, कर अधीक्षक तथा उपमुख्यअधिकारी व मुख्याधिकारी यांनी अहवालाद्वारे नमूद केलेले आहे.

सन २०१४-१५ चतुर्थ वार्षिक कर आकारणी चे दर हे चौरस फुट मध्ये आहेत. सदरच्या दरामध्ये १० % या प्रमाणे दरवाढ करण्यात यावी व सदर दर चौ. फुटाचे रुपांतर चौ. मीटर मध्ये करून त्याप्रमाणे दर निश्चित करावेत.

वरील सर्व बाबींचा विचार करता न.प. च्या उत्पन्नात कर विभागाचा प्रमुख उत्पन्नाचा भाग असून चतुर्थ वार्षिक कर आकारणी कामासाठी वरील पध्दतीच्या कामाचा पूर्व अनुभव असलेल्या व तांत्रिक दृष्ट्या कुशल संगणकीय ज्ञान असणाऱ्या एजन्सीकडून काम करुन घेणे उचित होणार आहे. यासाठी सर्व अंतर्गत सर्व्हे करुन नगरपरिषदेकडील मालमत्तांची सर्व बाबींची नोंद घेवून व नगरपरिषदेच्या सूचनेनुसार काम करणारी एजन्सी नेमणेस मंजूरी देणेकामी व यासाठी जाहिर ई –निविदा प्रक्रिया राबविण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च जिल्हा वार्षिक, राज्य वार्षिक योजना आमदार, खासदार निधी, इतर शासकीय योजना अथवा न.प. निधीच्या उपलब्धते नुसार करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**आर.यु. सुरडकर**
**प्रशासक**
**नगर परिषद मलकापूर.**